बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष – ०२ | अंक – २०६ | सोमवार दि.१४ एप्रिल २०२५ | आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू. | पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | Marathi | Year - 02 | Issue - 206 | Monday Dt.14 April 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | Price - 3 Rupees | Pages 4

सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ



# बीडमध्ये लाखोंचा भीमसागर उसळला

## आकाशी निळे झेंडे हाती, मशाल मुखी गगनभेदी 'जय भीम'चा नारा!







बीड । प्रतिनिधी

समाजक्रांतीचे जनक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी अलोट असा जनसागर लोटला होता. सुरुवातीला भन्ते बौद्ध धम्मशिल यांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करत त्रिशरण पंचशिल आणि बुद्धवंदना घेण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत आणि प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, रिपाई प्रदेश युवक अध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.

दि.४ एप्रिलपासून डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने सामाजिक न्याय भवनाच्या प्रांगणामध्ये विविध विषयावर विचारवंतांची व्याख्यानमाला, नाटक, संगीत, डान्स यासह विविध स्पर्धा या उत्सव समितीच्या वतीने गेल्या आठवडाभर घेण्यात आल्या. रात्री १२ वाजता जयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून समता ज्योतफेरी काढण्यात आली. या फेरीची सुरुवात पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली. आज सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून कारंजा, माळीवेस मार्गे प्रभात फेरीही काढण्यात आली.

शहरातील विविध बौद्ध विहारातून रथामध्ये बाबासाहेबांच्या प्रतिमेची मिरवणूक काढत बौद्ध उपासक, उपासिका यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. सकाळी ९ वाजता भन्ते धम्मशिल यांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करत त्रिशरण पंचशिल आणि बुद्धवंदना घेण्यात आली. अख्खे बीड शहरात बाबासाहेबांचा जयघोष करणारे बॅनर, निळे ध्वज लावण्यात आले होते. भल्या पहाटेपासूनच बौद्ध समाज भिम अनुयायी मोठ्या उत्साहात बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी जात होते. सुभाष रोड, माळीवेस भागात या समाजबांधवांना काही स्वयंसेवी संस्थांच्या वतीने अल्पोपहार, थंड पेयाची सोय करण्यात आली.

यावेळी अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी गोल्डे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिंदे गट सचिन मुळूक, जयंती उत्सव समितीच्या अरुणाताई आठवले, जयदीप सवई, अशोक हिंगे, ॲड. चंद्रकांत नवले, माजी आ. जनार्दन तुपे, हेमंत क्षीरसागर, कॉ. नामदेव चव्हाण, ॲड. महेश धांडे, प्रा. सुशिलाताई मोराळे आदी मान्यवर उपस्थित होते.











(सर्व छायाचित्र : सतीश गायकवाड)

# किल्ले सिंहगडावर विदेशी पर्यटकाबरोबर गैरवर्तन करणाऱ्या तरुणांवर कारवाई करा : दिनकर जाधव

बीड । प्रतिनिधी

हिंदुस्थानात महाराष्ट्र राज्य विकसनशील आणि पुरोगामी राज्य संपुर्ण देश आपल्याकडे पाहत आहे. तसेच अखंड हिंदुस्थानातील जनतेचे दैवत म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या रयतेला सुखी ठेवण्यासाठी आयुष्यभर स्वकीय आणि परकीयांशी लढा दिला त्याच छत्रपती शिवाजी महाराजांनी शत्रूला सळो की पळो करुन सोडले व किल्ले ताब्यात घेतले. तब्बल ४५० वर्षानंतरही जगाला आणि देशाला दिशा देणारे



किल्ले परदेशी पाहण्यासाठी आणि अभ्यासासाठी येथे येतात, त्यावेळी मात्र काही राक्षसीवृत्तीच्या लोकांकडून त्या पर्यटकांना अपमानास्पद वागणूक दिली जाते. आशीच घटना नुकतीच सिंहगड गड पाहण्यासाठी आलेल्या न्यूजीलंडच्या पर्यटकासोबत घडली आसून त्याचे चलचित्रेही सोशल मिडिया आणि दुरचित्रवाहीनी याद्वारे प्रक्षेपण झाले. या घडलेल्या घटनेने महाराष्ट्र राज्याची मान शरमेने खाली झुकत आहे. त्यामुळे या नराधमांना कायद्याने वेळीच धडा शिकवा.

किल्ले सिंहगडावर न्यूझीलंड वरून आलेल्या पर्यटकाबरोबर काही तरुणांनी गैरव्यवहार केल्याची व्हिडीओ क्लिप समाज माध्यमांवर प्रसिद्ध झाली आहे. या तरुणांनी किल्ल्याचे पावित्र्य भंग केले आहे. तसेच या पर्यटकाला मराठी भाषेतील अश्लाघ्य शब्द बोलण्यास सांगितले. त्याचे भाषेबद्दल असलेल्या अज्ञानाचा गैरफायदा घेतला. त्यांनी मराठी भाषेचा आणि हिंदू संस्कृतीचा अपमान केला आहे. यामुळे आपल्या संस्कृतीची, राज्याची आणि देशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर बदनामी झाली आहे. या तरुणांना शोधून काढून त्यांचे वर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी. अशी मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी मुख्यमंत्री कार्यालयाला ईमेलद्वारे तसेच प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# अनिल राधे मित्र मंडळाच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

येथील अनिल राधे कांबळे मित्र मंडळाच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मोहन जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी नितीन नाईकनवरे हे होते. यावेळी जयसिंग सोळंके, सभापती जयदत्त नरवडे, राजेश घोडे, संतोष यादव, भास्कर शिंदे, धम्मानंद साळवे, अमोल शेरकर, दत्ता कांबळे, विठ्ठल तुपसौंदर, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत, शरद यादव, पापा सोळंके, शरद यादव, प्रल्हाद दळवी, कचरू कांबळे,



बबन खंडागळे, सरपंच नारायण भले यांचे सह भिमभक्त उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी दशरथ कांबळे, बाबासाहेब कांबळे, भानुदास कांबळे, संतोष कांबळे, विठ्ठल कांबळे, सुरज कांबळे, युवराज कांबळे, आदित्य वाघमारे, विलास लोंढे, मयूर कांबळे, दत्ता कांबळे, विक्रम कांबळे, श्याम कांबळे, संकेत कांबळे, अविनाश कांबळे, प्रशांत कांबळे, प्रदीप कांबळे, बाळू कांबळे, अरविंद लोखंडे, नागेश कांबळे, आदेश वावळे, सागर कांबळे यांनी परिश्रम घेतले.

# वाचाळवीर कोकाटे यांनी आपले वक्तव्य माघार घेऊन माफी मागावी : तांदळे

बीड । प्रतिनिधी



कृषीप्रधान राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे वारंवार आपल्या आकलेची मुक्ताफळे उधळत हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत असुन त्यांच्या शेतकरी विरोधी वक्तव्याचा निषेध व्यक्त करत त्यांच्यावर तत्काळ कारवाई करण्याची मागणी विलास बापु भुमरे सामाजिक प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष अविनाश तांदळे यांनी केली आहे.

जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा हवालदिल असताना कधी निसर्गाचा लहरीपणा तर कधी सरकारचा जुलमिपणा यामध्ये कायम होरपळला जात आहे. निवडणुकीच्या काळामध्ये शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी व शेतमालाल हमी भाव देण्याचे खोटे आश्वास देवुन सत्तेत बसलेल्या सरकारच्या नेत्यांना शेतकऱ्यांशी काहीही देणेघेणे राहिलेले दिसत नाही. अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या हिताचा कोणताही निर्णय हे सरकार घेवु शकले नाही. याउलट राज्याचे कृषिमंत्री मोहदय वारंवार शेतकरी विरोधी वक्तव्य करुन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत.

कर्जमाफीच्या पैशातून शेतकरी साखरपुडा, लग्न लावतात. कांद्याचा भाव पडायला शेतकरीच जबाबदार आहेत. यासारखे वक्तव्य करुन आपल्या आकलेचे तारे तोडणाऱ्या माणिकराव कोकाटे यांच्यावर तत्काळ कारवाई करण्यात यावी. त्याच बरोबर शेतमालाला हमीभाव व शेतकरी कर्जमाफी करण्याची मागणी विलास बापु भुमरे सामाजिक प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आली आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त महिलांना साड्या वाटपाचा कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

भारतीय संविधानाचे जनक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून राजमुद्रा सामाजिक संघटने मार्फत. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर (आप्पा) पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच मराठवाडा संपर्क प्रमुख सामाजिक कार्यकर्ते बबलू (भैय्या) शिंदे यांच्या संयुक्त विद्यमानाने महिलां व माता भगिनी यांना साड्या वाटप




करण्यात आल्या. आज दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रमुख उपस्थिती राजमुद्रा सामाजिक संघटनाचे संस्थापक अध्यक्ष किशोर (आप्पा) पिंगळे, नगरसेवक शुभम धूत, सरपंच अमोल बागलाने, सुरवसे बापू, उज्वल दादा स्वामी, रंजीत भाऊ पिंगळे, गणेश कुडुक या मान्यवराच्या हस्ते महिला बघीनींना साड्या वाटप करण्यात आल्या. व अन्न दान करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे आयोजक बबलू (भैय्या) शिंदे व त्यांचे सहकारी मित्र भारत काळे, तुषार जोगदंड, विशाल काळे, शाम सपकाळ, शेख कलीम, बबलू कळस्कर, अमित गायकवाड, प्रमोद वंजारे, शुभम दळवी, संतोष सुतार, आदी मित्र परिवार मंडळी यांनी कार्यक्रमांस उपस्थिती देऊन आपले मोलाचे योगदान दिले.

# दिलदार मनाचा माणूस : सुरज दादा खाडे

## आदर्श युवा नेता, जीवाला जीव देणारा 'मित्र' आणि तत्त्वांची वाट दाखविणारा 'वाटसरु'

तरुणांच्या जीवनात यशाचे शिखर सहजासहजी गाठता येत नाही, त्यासाठी प्रचंड मेहनत, जिद्द व हिम्मतीने ते शिखर सर करायचे असते. तुमची मेहनत आणि मनात जिद्द असेल तर हिमालय देखील तुम्ही जिंकू शकता. जिंकण्याची हि जिद्द तरुणाकडे आहे, त्यासाठी लागणारे कष्ट त्या सहन करतात आणि यशस्वी होतातच. संघर्षासह सादर करत यशाचे शिखर देखील असेच सुरूवातीला आपल्याला कठीण वाटते, मात्र एकदा का जिद्दीने प्लानिंग करून शिखर चढायला सुरूवात केली की, यश हे मिळणार असल्याचे दिसून येते.

आता सर्व क्षेत्रात तरुण वर्ग कार्यरत पुढे येत आहेत, त्यांना साथ देण्याची गरज आहे. तरुणांनी आपण इतरांना आपले 'आयडॉल' मानण्यापेक्षा असे काम करा की, तुम्ही इतरांसाठी 'आयडॉल' असले पाहिजे. युवकांनी एकमेकाना सहकार्याचा हात देऊन पुढे जायला पाहिजे. असेच आमचे जिवलग सहकारी मित्र श्री. सुरज खाडे हे सर्वांना सोबत घेऊन चांगले सत्कार्य करतात.

प्रामाणिक माणुस आयुष्यात नेहमीच सरळ असतो आणि जीवनातील अडचणींना तोंड देण्यासाठी प्रामाणिकपणा आणि प्रामाणिकपणाचा आधार घेत नाहीत त्यासाठी संघर्ष करून न्याय मिळवून घेतात प्रामाणिकपणा माणसाचे धैर्य आणि आत्मविश्वास वाढवते. प्रामाणिक माणुस कधीही त्याच्या कृतींच्या कुठल्याही गोष्टीला घाबरत नाही. त्याला मनःशांतीची स्थिती मिळेल. व सुरज दादा खाडे सामाजिक आणि व्यावसायिक परिघात वावर आणि समज असणारा एक सृजनशील युवा तरुण मित्र आहे माणुसकी जोपासण्याची पताका खांद्यावर घेऊन दिंडीचा वारकरी होणारा आमचा सुरज दादा खाडे कायम दायित्वाचा आणि सलोख्याचा प्रतीक ठरलेला आहे. शून्यातून विश्व निर्माण करणारा एक युवा तरुण कर्तबगार, सर्जनशील, मितभाषी युवा म्हणून ज्यांच्याकडे गेवराई शहरात पाहिलं जातं तो म्हणजे आमचा लाडका सुरज दादा खाडे होय. आपल्या शांत संयमी स्वभावातून प्रत्येकाच्या अडी अडचणीला मदत करून आपण समाजाचे काही देणे लागतो हा उदात्त हेतू मनाशी बाळगून कायमस्वरूपी मित्राना आणि गरजवंताला मदत करत असताना अनुभवायला मिळाले. म्हणूनच सुरज दादा त्यांच्या मनमोकळ्या स्वभावामुळे ते मित्रांच्या आणि आपल्या नातेवाईकांच्या गळ्यातील ताईत बनले आहे. मित्रांसाठी काहीपण, कुठेपण आणि कधी पण करण्याची त्याची तयारी असते. सतत आपल्या कामात व्यस्त असणारा हा तरुण सहकारी आपलं काम भलं म्हणून कासवाच्या गतीने यशाची पावलं सर करीत आहे. आपला स्वभाव प्रांजळपणे असल्याने विरोधकालाही आपला स करण्याची ताकद आपल्या गोड शब्दात आहे दिलदार माणूस आम्हा मित्रांना लाभला आहे. स्वतःच्या कर्तबदारीमुळे समाजात आणि ताकडगाव या ग्रामीण भागातून गेवराई शहरात एक यशस्वी उद्योजक म्हणून काम करत आता प्रसिद्धीच्या झोतात आलात म्हणून मला त्यांचे खूप कौतुक वाटते. आज तुम्ही यशाचा उत्तुंग शिखरावर असताना देखील त्यामध्ये कसलाच गर्व नाही, सगळ्यांच्या कामी धावून जातात आणि उद्योग क्षेत्रामध्ये माझे सहकारी मित्रही आले पाहिजेत त्यांनी ही काही ना काही उद्योग केला पाहिजे हा विचार सतत त्याच्या डोक्यात असतो. म्हणून जो सर्वांच्या भल्याचा विचार करतो देव त्यांना भरभरून देतो असेच म्हणावे लागेल. सुरज दादांनी सामाजिक व आध्यात्मिक परंपरा जोपासत प्रामाणिकपणे आई वडील व देवदैवतांची सेवा केली सुरज दादा नम्र स्वभावात दिलखुलाश आणि सातत्याने गोरगरिबांची होईल तेवढी सेवा करण्याचा हेतू मनाशी बाळगून कायमस्वरूपी मित्रांना सहकार्य करण्यात ते माहीर असतात म्हणून आमचे मित्र विशाल जंवजाळ यांच्या मुळे सुरज दादांचा संपर्क माझ्याशी झाला आणि त्यांच्या सातत्याने सावलीसारखे सोबत असणारे बदाम पौळ या दोघांनी सुरज दादा ची आणि आमची मैत्री अतिशय घट्ट केली. सुरज दादांनी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे यशाचा मार्ग काढत आपल्या उद्योग व्यवसायाला बळकटी दिली आणि मोठ्या हिंमतीने कामाला सुरुवात करत त्यांनी आपली ओळख सर्व दूर गाजवली या ओळखीचा फायदा व्यवसायिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात झाला म्हणून सुरज दादांच्या स्वप्नांची पूर्ती येणाऱ्या काळात निश्चितपणाने होईल यासाठी श्री. भगवान बाबा यांच्या चरणी नतमस्तक होऊन प्रार्थना करतो आणि दादांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देऊया.



**लेखक शुभम घोडके**
**मो.८३०८३९०००८**



माजलगांव येथे अनिल राधे कांबळे मित्रमंडळाच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.




विश्वरत्न परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुरूषोत्तमपुरी येथे सर्व समाज बांधवांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.



मौजे जायकोवाडी येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समाज बांधवांकडून अभिवादन करण्यात आले.



श्याम विद्यालय, श्याम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ वरिष्ठ महाविद्यालय दहिफळ वडमाऊली येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्तान प्रतिमा पूजन करून विनम्र अभिवादन करताना ज्येष्ठ शिक्षक ठोंबरे बळी गुरुजी, श्रीमती ठोंबरे आयडी, श्री बी एस मुंडे, श्री ठोंबरे डी. बी. वाघमारे दगडू, ठोंबरे गोरख आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी.



बीड – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त नगर नाका येथिल जीवन संजीवनी वेलनेस अँड फिटनेस सेंटर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, यावेळी फिटनेस कोच श्रीमती मनिषा जायभाये मॅडम, फहीम इनामदार, शिंदे सर व पवार सर उपस्थित होते.




सिरसमार्ग येथे भीमजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गणेश मगर, पत्रकार संचार उमाप, जगदीश जाधव, राकेश हजारे, नारायण सिरसट हे उपस्थित होते

# सरस्वती फाऊंडेशन गरजवंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्यासाठी कटिबद्ध असेल : सुनीता रनबावळे

परतूर । प्रतिनिधी

तळागाळातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात समतेचा सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी सरस्वती फाऊंडेशन गरजवंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्यासाठी कटिबद्ध असेल असे प्रतिपादन सरस्वती फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती सुनीता संतोष रनबावळे यांनी केले.

परतूर येथे सरस्वती फाऊंडेशन च्या वतीने महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सरस्वती फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती सुनीता संतोष रनबावळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. दरम्यान विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी नागोराव सूर्यवंशी, संतोष रनबावळे, गजानन सूर्यवंशी, आनंद गजभारे, गणेश गजभारे, आदित्य गजभारे, उदय रनबावळे, श्रीमती प्रयागबाई सूर्यवंशी, विद्या रनबावळे, संगीता सूर्यवंशी, आशा सूर्यवंशी यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना श्रीमती सुनीता रनबावळे म्हंटल्या की, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विचार प्रवाहांना सुयोग्य वळण मिळवून देण्याचे काम शिक्षणाचे आहे. या अनुषंगाने गरजवंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समाजात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार व्हावा याकरिता सरस्वती फाऊंडेशन शिक्षण क्षेत्रात कर्तव्यदक्षतेने कार्य करेल. समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांचा सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि बौद्धिकदृष्ट्या सर्वांगीण विकास साधावा याकरीता शासनस्तरीय विविध कल्याणकारी योजनांचा लाभ गरजवंत विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी सरस्वती फाऊंडेशन कायम कटिबद्ध असेल, असे श्रीमती मत सुनीता रनबावळे यांनी व्यक्त केले.

# बाबासाहेबांच्या संविधानामुळे मी आमदार झालो : आ. पंडीत



## तलवाडा येथे मोठ्या उत्साहात डॉ आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन सभा संपन्न

तलवाडा | प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे भीमजोती संयोजन समितीच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती निमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती या सभेसाठी तालुक्यातील सर्वच मान्यवर तलवाडा येथील पूर्णकृती बाबासाहेबांच्या पुतळयास अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते

यावेळी प्रमुख पाहुणे माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब म्हणाले की, मुलाच्या अभ्यासासाठी अभ्यासिका देण्याची कबूल केले तर आमदार विजय सिंह राजे पंडीत यांचा समाज बांधवांनी सत्कार आयोजन केले होते.

या वेळी आपल्या भाषणात आमदार पंडीत म्हणाले की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे मला आमदार हे संविधानिक पद मिळाले असून महापुरुषांनी कधी एका जाती साठी काम केले नसून संविधाननात अशी तरतूद करण्यात आली आहे की शेवटच्या उपेक्षित घटकांना न्याय मिळावा अशी कायद्यात तरतुत करण्यात आली आहे यावेळी बाबासाहेबां विषय मनोगत रिपाईचे किशोर कांडेकर, समाजभूषण अनिल तुरुकमारे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाला उपस्थिती कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच मीना हात्त, विष्णू हाते, वंचित बहुजन आगडी चे पप्पू गायकवाड, बंटी सौंदर मल, समता परिषदेचे अध्यक्ष बापु गाडेकर, लहुजी सेनेचे जिल्हा अध्यक्ष दादाराव रोकडे, रणजित घुंबर्डे, उपसरपंच अक्रम सौदागर, ग्राम पंचायत सदस्य बळीराम अण्णा शिंदे, मोबिन खतीब सर्वच पदाधिकारी उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय डोंगरे सर यांनी करून त्याची कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांची धडपड पाहता त्याचा समाज बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माऊली नाना डोंगरे यांनी केले.

## जि.प.प्रा. शाळा शहापूर मजरा येथे आंबेडकर जयंती साजरी

माजलगाव | प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शहापूर मजरा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार गंगाभीषण आळणे याने अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शालेय समिती अध्यक्ष संतोष गाढवे, सरपंच नवनाथ आणणे, माजी सरपंच प्रकाश आळणे, दत्तात्रेय गाढवे, तुकाराम चाळक, नवनाथ फरतडे शिक्षक आप्पासाहेब चव्हाण, महादेव चव्हाण, विलास चव्हाण, ज्ञानेश्वर आळणे गावातील सर्व नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मुख्याध्यापक श्री साबळे सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्राची माहिती सांगितली. त्यांच्याप्रमाणेच विद्यार्थ्यांनी अभ्यास करून आपल्या जीवनात यश संपादन करावे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी १८ तास अभ्यास करून अनेक पदव्या त्यांनी प्राप्त केल्यात भारतरत्न हा भारतीय पुरस्कार त्यांना मिळाला. अशा या महामानवास विनम्र कोटी कोटी अभिवादन केले यावेळी नागरिक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

### सार्वजनिक उत्सव समिती अध्यक्षपदी शंकर निर्मळ तर उपाध्यक्षपदी अमोल निर्मळ यांची निवड

लिंबागणेश | प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे आज दि.१४ एप्रिल सोमवार रोजी राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर सुत्रसंचलन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष शंकर निर्मळ यांनी केले. आभारप्रदर्शन उपाध्यक्ष अमोल निर्मळ यांनी केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायावर आधारीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मुलमंत्र देऊन देशातील उपेक्षित समुहातील बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठवण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे प्रतिपादन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. प्रा.लेनाजी गायकवाड यांनी आदर्श डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात यावी हे कविता सादर केली. यावेळी राजाभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ, बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, सुरेश निर्मळ, अँड.गणेश वाणी, रामदास मुळे, दादा गायकवाड, संतोष भोसले आदी सहभागी होते.

यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असुन अध्यक्षपदी शंकर ऊर्फ रिंकु निर्मळ यांची तर उपाध्यक्षपदी अमोल निर्मळ यांची निवड करण्यात आली. सचिवपदी स्वप्निल वक्ते, कोषाध्यक्ष पदी स्वप्निल निर्मळ, सभासद म्हणून सुमेध निर्मळ, स्वप्निल निर्मळ, सौरभ निर्मळ, प्रकाश निर्मळ, तुळशीराम पवार, तुकाराम गायकवाड यांची आरूण निर्मळ, जितु निर्मळ, ज्ञानोबा निर्मळ, पोपट निर्मळ बन्सी निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी निवडी करण्यात आल्या. समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी भिमजयंती साजरी करण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



आज दि. १४ एप्रिल२०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बीड येथे विनम्र अभिवादन व निळा झेंडा फडकवताना मराठवाडा आरोग्य विभाग प्रमुख नितीन महुवाले.

## सिरसाळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने भीम ज्योत रॅलीचे आयोजन

सिरसाळा | प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सिरसाळा या ठिकाणी रात्री ठीक १२ वाजता आंबेडकर चौक सिरसाळा या ठिकाणी भीम ज्योत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मोठ्या जोशात घोषणा देत ही रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मोठ्या उत्साहामध्ये डॉ.आंबेडकर चौकात आली. व या ठिकाणी १३४ तोफा वाजून ठीक बारा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सलामी देण्यात आली.



याप्रसंगी मोठ्या प्रमाणात सिरसाळ्यातील बौद्ध बांधव भीम सैनिक व महिलां उपस्थित होते. यामध्ये राम दादा किरवले, मधुकर किरवले, अच्युत किरवले, सुरेश उजगरे, हर्ष चोपडे, सुभाष चोपडे, प्रा. दयानंद झिंजुर्डे, संभाजी आरसुळे, कपिल किरवले, राज किरवले, अमोल किरवले, लखन किरवले, पोलीस अजय किरवले, मिलिट्री मॅन सागर भैया, निकेश किरवले व महिला मंडळ जास्तीत जास्त समावेश दिसून आला. यावेळी बुद्ध वंदना घेण्यात आली व १३४ तोफांची रात्री ठीक १२ वाजता जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सलामी देण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या.



भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज बीड शहरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व उपस्थित सर्व भिमसैनिकांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी रिपाई चे तालुका अध्यक्ष किशनजी तांगडे, रासप चे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेबजी मतकर, तालुका उपाध्यक्ष भाऊसाहेबजी कांबळे, युवा नेते दिपक घोडके पाटील, राम वडमारे सह सर्व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्काराने योगतज्ञ राधा सचिन तांबे (घोलप) या सन्मानित

बीड | प्रतिनिधी

नुकतेच ११ एप्रिल रोजी स्त्री शिक्षणाचे प्रणेते व खंदे पुरस्कारकर्ते महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. अशा थोर समाजसुधारकांमुळे आज समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिला उत्तुंग भरारी घेत आहेत. अशाच एक आंतरराष्ट्रीय योग खेळाडू श्रीमती राधा तांबे (घोलप) यांना संजीवनी फाउंडेशनतर्फे योग क्षेत्रामध्ये केलेल्या अभूतपूर्व कामगिरीबद्दल शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत, राजाधिराज श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने मिळणारा पुरस्कार इतर कोणत्याही नागरी पुरस्कारापेक्षा कित्येक पटीने अधिक सन्मानकारक वाटतो. कारण पारतंत्र्याच्या गुलामीत खितपत पडलेल्या या महाराष्ट्रभूमीला आणि जनतेला स्वातंत्र्याची जाणीव या देवतुल्य महामानवांनी करून दिली. त्यामुळे परकीय आक्रमकांविरुद्ध स्वातंत्र्याची लाट संपूर्ण भारतभर पसरू लागली.

आदर्श राजा कसा असावा आणि आदर्श राज्य कसे असावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची शासनव्यवस्था होय. त्यांच्या शासनात जात, भेद, पंथ, वर्ण, कुळ अशा संकुचित विचारधारेस थारा नव्हता, उलट अशा गोष्टींवर कठोर प्रतिबंध असायचे. अशी उज्वल परंपरा असलेली ही भूमी महाराजांमुळे घडली. निराशेच्या गर्तेत सापडलेल्या या भूमीला आशेचा किरण दाखवणारे महाराज होते.

सामान्य रयतेसाठी त्यांनी बनवलेले नियम प्रशासनावर बंधनकारक होते. कोणावरही अन्याय होणार नाही यावर त्यांची करडी नजर असायची. गरीब रयतेकडून त्यांनी कधीही शेतसारा वसूल केला नाही. उलट जे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असतील, त्यांच्यासाठी महाराज दुष्काळात तगाईची सोय करत असत. महाराजांच्या राज्यात महिलांना सर्वोच्च सन्मान दिला जात असे, कारण त्यांच्यावर संस्कारांची घडण राजमाता जिजाऊंनी केली होती. लहानपणापासूनच उच्च विचारांचे बाळकडू राजमातांनी आपल्या शिवबांमध्ये बिंबवले, याचेच परिणामस्वरूप आज या महाराष्ट्राला परम आदरणीय छत्रपती शिवाजी महाराज लाभले.

महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात अनेक दिग्गज सल्लागार असले तरी अंतिम निर्णय ते आपल्या मातोश्रींच्या विचारानेच घेत असत, यावरूनच समजते की महाराष्ट्रात फार पूर्वीपासून महिलांचे राजकीय आणि आर्थिक पातळीवर स्थान सर्वोच्च होते आणि आजही आहे. याच आदर्शाला स्मरून आज श्रीमती राधा तांबे यांनी देश-विदेशामध्ये महाराष्ट्राच्या मातीचे नाव उज्वल केले आहे. जिद्द, चिकाटी, विवेकनिष्ठा, संयम आणि सातत्य ही मूल्ये त्यांनी या महाराष्ट्राच्या मातीने आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने आत्मसात केली आहेत. त्याच प्रेरणेतून त्यांनी एक नव्हे तर तब्बल तीन देशांमध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळून सुवर्णपदके पटकावली आहेत.

त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीच्या पार्श्वभूमीवर त्यांना विविध क्षेत्रांमधून अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मात्र संजीवनी फाउंडेशनतर्फे दिला गेलेला हा पुरस्कार माझ्यासाठी सर्वोत्कृष्ट आहे, कारण या पुरस्काराचे नाव 'शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार' असून यापेक्षा श्रेष्ठ सन्मान आयुष्यात कोणता असेल? असे त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिली प्रेरणा जगण्याची, निराशेतून आशेकडे जाण्याची, हरणार नाही उमेद कधीही मी लढण्याची, कारण मुलगी आहे मी राजा शिवबाची अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी या पुरस्काराच्या निमित्ताने व्यक्त केली.

समाजात आज संजीवनी फाउंडेशनसारख्या समाजसेवी संस्था असल्यामुळे समाजातील अशी उत्कृष्ट समाजसेवी व्यक्तिमत्वे ओळखण्याचे आणि सन्मानित करण्याचे कार्य शक्य होत आहे. संजीवनी फाउंडेशनतर्फे आयोजित शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात, महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे साहेब, माननीय खासदार राजाभाऊ वाजे, उपायुक्त विकास नवाळे, राज्य महिला आयोगाच्या सदस्या उत्कर्षाताई, राज्यमंत्री रविकांत तुपकर साहेब, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, कामगार नेते अभिजीत राणे आणि इतर विविध मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीमती राधा तांबे यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याचे प्रमुख निमंत्रक डॉ. ज्ञानेश्वर सानप (चेअरमन संजीवनी फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य), रोशन सानप व इंजिनीयर गणेश सांगळे यांच्या उत्कृष्ट आयोजनामुळे पुरस्कार सोहळा अगदी दिमाखात पार पडला.



बीड : भारताचे संविधान रचयिते महामानव भारतरत्न डॉक्टर भीमराव उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ




बीड : भारताचे संविधान रचयिते महामानव भारतरत्न डॉक्टर भीमराव उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ

# वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्याची ऑफर!

## निलंबित पोलीस अधिकारी रणजित कासले यांचा धक्कादायक गौप्यस्फोट
## बीड जिल्हा प्रशासनात उडाली मोठी खळबळ



बीड । प्रतिनिधी

बदलापूर येथील अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा २३ सप्टेंबर २०२४ रोजी पोलिसांनी एन्काऊंटर केला होता. अक्षयने गोळीबार केल्यानंतर स्वसंरक्षणार्थ पोलिसांनी गोळ्या झाडल्या, असा दावा पोलिसांकडून करण्यात आला. मात्र, न्यायालयीन चौकशी अहवालानुसार, अक्षयच्या हाताचे ठसे पोलिसांनी जप्त केलेल्या बंदुकीवर आढळले नाहीत, ज्यामुळे एन्काऊंटरच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. हे प्रकरण ताजे असतानाच दुसरीकडे बीड जिल्ह्यात सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने एकच खळबळ उडाली. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोप वाल्मिक कराडसह त्याच्या सहकाऱ्यांनाही अटक करण्यात आली होती.

याशिवाय याप्रकरणात बीडमधील सायबर गुन्हे शाखेचे अधिकारी रणजित कासले यांच्यावरही निलंबनाची कारवाई करण्यात आली. आता या प्रकरणात रणजित कासले यांनी धक्कादायक गौप्यस्फोट करत थेट राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरच गंभीर आरोप केले आहेत. मला वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर होती. पण मी ती नाकारली, म्हणून माझे निलंबन करण्यात आले, असा दावा रणजित कासले यांनी केला आहे. एका व्हिडीओच्या माध्यमातून त्यांनी यावर भाष्य केलं आहे. तसचं बोगस एन्काऊंटर कसा केला जातो. त्यात कोण कोण सामील असते, यावरही भाष्य केलं आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर होती असा दावा निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी केला आहे. रणजीत कासले हे बीडच्या सायबर विभागात पोलीस निरीक्षक होते. मागील काळात त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यानंतर कासले यांनी अनेक दावे त्यांच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून केले आहेत. त्यात वाल्मीक कराडच्या एन्काऊंटच्या दाव्यामुळे खळबळ उडाली आहे. रणजीत कासले यांनी व्हिडिओ पोस्ट करत म्हटलंय की, मी अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरची बातमी पाहिली. या ५ पोलिसांवर गुन्हे दाखल करा आणि एसआयटी बसवा असं कोर्टाने म्हटलं. एसआयटी बसवून काही उपयोग होणार नाही. जर चौकशी करायची असेलच तर केंद्राची यंत्रणा बसवा, मग त्यातून सत्य बाहेर पडेल. फेक एन्काऊंटर कसे होतात हे मी सांगतो. ज्यावेळी मला वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर दिली होती पण मी नकार दिला. एन्काऊंटरसाठी मोठी रक्कम ऑफर दिली जाते, १०, २०, ५० कोटी इतके दिले जातात. तुम्ही बोलाल तेवढे पैसे देतात. मी सायबर शाखेत होतो, पण मी हे करू शकतो हे माहिती असल्याने त्यांनी मला ऑफर दिली होती असं त्यांनी सांगितले.तसेच मी मोठेपणा सांगत नाही. परंतु फेक एन्काऊंटर करताना ४ लोकांची टीम असते, त्यात मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, गृह सचिवांची गुप्त बैठक होते. त्यात काय करायचे हे ठरते. मग त्यानंतर ५-६ विश्वासू लोकांची टीम बनते. ती संबंधित ठिकाणी जाते, म्हणजे अक्षय शिंदे याचे झाले तसे, तिथे १ अधिकारी, २-३ अंमलदार अशी आणखी एक टीम तयार केली जाते. त्यांना ५,१०, १५ कोटी मोठी रक्कम एकाच वेळी दिली जाते. त्यानंतर या घटनेची चौकशी आपलेच सरकार करेल, त्यातून तुम्हाला मुक्त करू अशी वचने दिली जातात अशाप्रकारे बोगस एन्काऊंटर घडवून आणले जातात हा दावा निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी केला.



## गेवराईत पत्रकाराचे घर फोडले; सत्तर हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास

### गेवराईत चोरट्यांचे पोलिसांसमोर आव्हान

गेवराई । प्रतिनिधी

घरात कोणी नसल्याचा फायदा घेत पत्रकाराचे घर फोडून सोन्याचांदीच्या दागिन्यांसह नगदी रोकड असा एकूण सत्तर हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना मंगळवार दि.८ एप्रिल २०२५ रोजी पहाटेच्या सुमारास ताकडगाव रोड, केशरदीप निवास गेवराई येथे घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास गेवराई पोलीस करत आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई शहरातील मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई येथे कार्यरत असलेले शिक्षक व दैनिक लोकाशाचे पत्रकार विनोद नामदेव पौळ रा. सुशी (व), हल्ली मुक्काम ताकडगाव रोड केसरदीप निवास गेवराई हे पत्नी व मुलांसह गेल्या सहा-सात वर्षांपासून गेवराई येथे राहतात तर दि.७ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३.३० वा. चे सुमारास पत्नीस शारदा हॉस्पीटल, गेवराई येथे प्रस्तुतीसाठी अँडमीट केल्याने घराला कुलूप लावून दवाखाण्यात गेले होते. दरम्यान दि.८ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९.३० वा.चे सुमारास घरी आले असता घराच्या दरवाजाला असलेला कोंडा कटरच्या सहाय्याने कट करुन दरवाजा अर्धवट उघडा असल्याचे दिसून आले त्यानंतर घरात प्रवेश करुन पाहीले असता घरातील पसारा अस्ताव्यस्त पाहताच घरात चोरट्यांनी चोरी केल्याचे निदर्शनात आले. दरम्यान घरातील कपाटाचा दरवाजा तोडून आतील



साहीत्य अस्ताव्यस्त फेकलेले दिसले. त्यांनी ताबडतोब या घटनेची गेवराई पोलीस ठाण्याला माहिती दिली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून कपाटातील लॉकर मधील सोन्याचांदीचे दागिने व नगदी रोख रक्कम असा एकूण एकोंसत्तर हजार तीनशे तीस रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याचे दिसून आले. दरम्यान याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात कलम ३०५ (ए), ३३१ (४) भा. न्या. स.नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास गेवराई पोलिस ठाण्याचे पो.नि.प्रविणकुमार बांगर, स.पो.नि. संतोष जंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल धन्यपाल लोखंडे हे करत आहेत.

## दर्जेदार शिक्षणासाठी राजेगाव ग्रामस्थांचा लोकसहभाग उल्लेखनीय : अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षणासाठी राजेगाव येथील ग्रामस्थांनी पुढाकार घेतला असून लोकसहभागातून संगणक प्रयोगशाळा उभारून उल्लेखनीय काम केल्याचे गौरवोद्गार जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांनी काढून कामाचे समाधान व्यक्त केले. शाळेच्या विकासाच्या संदर्भात जी मदत मागितली जाईल ती प्राधान्याने पूर्ण करू अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे राजे गाव येथील लोकसभागातून जिल्हा परिषद शाळेत उभारलेल्या सुसज्ज कॉम्प्युटर लॅबचे उद्घाटन करताना ते बोलत होते.



जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा राजेगाव येथे शिक्षण घेत असलेल्या पहिली ते सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी १५ कॉम्प्युटर असलेली सुसज्ज कॉम्प्युटर लॅब लोकसहभातून निर्माण केली आहे. या लॅबचे उद्घाटन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. या कॉम्प्युटर लॅबसाठी ४.५ लाखाचा निधी उपलब्ध करून देणारे इम्रानजी नाईक, गोविंदराव गरड, सौ. शिल्पाताई राठोड, सौ. शारदाताई कचरे यांचा यावेळी स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कॉम्पुटर लॅबच्या उद्घाटनाचे औचित्य साधून शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन थाटामाटात पार पडले. या स्नेहसंमेलनात चिमुकल्यांनी अतिशय उत्कृष्ट नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित यांनी कॉम्प्युटर लॅबचे कौतुक केले.

कार्यक्रमाला नाम फाऊंडेशनचे समन्वयक राजाभाऊ शेळके, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष कालिदास नवले, भागवत खुळे, सतीश वराट, श्रीहरी पाटेकर, प्रमोद गरड, अरुणभाऊ इंगळे, संजयआप्पा कचरे, श्रीपाद कचरे, शरद कचरे, गोविंद कचरे, डॉ.जनक चौरे, किशोर वाघमारे, रामनाथ कचरे, मुख्याध्यापक अभिमन्यू इबिते, अशोक कचरे, सौ.रुपालीताई कचरे, संतोष कचरे, महेश बादाडे, रमेश फपाळ, विठ्ठल आरबे, राहुल टाकणखार, शिंदे सर, पोटभरे सर, रवि आदमाने, आयाज सिद्दिकी, अनिल साळवे, सर्जेराव शिंदे, ज्ञानेश्वर घाटूळ, अनिस सय्यद, संतोष गोरे, अनिल कचरे, काशिनाथ इंगळे, भागवत सागुते, रामचंद्र चिंचाने, पांडुरंग कचरे, विशाल साळवे, गणेश कचरे, बाबासाहेब साळवे, सौ उंबरे मॅडम, टाकणखार सर, घाटूळ सर, गायकवाड यांच्यासह सर सर्व पालक, गावातील तरुण, शाळेला वेळोवेळी सहकार्य करणारे बाळू बादाडे, प्रल्हाद गायकवाड, केशवबापू कचरे, रामदास शेळके, गजानन इंगळे, विजय साळवे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक वाडेकर, कु.नंदिनी कचरे, कु.सोनवणे, उंबरे मॅडम यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष पाटील कचरे यांनी तर पाहुण्याचे स्वागत महेश बादाडे यांनी केले. उपस्थित सर्वांचे शाळेचे मुख्याध्यापक श्री नारायण कचरे यांनी आभार मानले.









हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT